सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०४/२०१२-१३

महापालिका सभा दिनांक १२/०७/२०१२ करीता.

गुरुवार दि.१२/०७/२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.सौ.विद्याताई उत्तमराव कांबळे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील वॉर्ड क्र.२१ मधील टिंबर एरिया येथील लगत असणाऱ्या मागसवर्गीय परिसरास भिमनगर असे नामकरण करणेत यावे याबाबत नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करता वॉर्ड क्र.२१ मधील टिंबर एरिया येथील लगत असणाऱ्या मागसवर्गीय परिसरास भिमनगर असे नामकरण करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.सौ.विद्याताई उत्तमराव कांबळे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील वॉर्ड क्र.२१ मधील नविन वसाहत टिंबर एरिया रोड गुरुद्वार मंदिर समोरील चौकास लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण करणेत यावे याबाबत नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करता वॉर्ड क्र.२१ मधील नविन वसाहत टिंबर एरिया रोड गुरुद्वार मंदिर समोरील चौकास लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.शेडजी सुबराव मोहिते, यांनी दिलेला प्रस्ताव :-

कुपवाड हद्दीतील स.नं.४७५/१ मधील खुली जागा सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीची असून, त्यामध्ये महानगरपालिकेने खुले नाट्यगृहाचे बांधकाम केले आहे. सदर नाट्यगृहास प्रसिद्ध तमाशा सम्राट कै.बाबुराव कुपवाडकर असे नामकरण ही करणेत आले आहे. सद्या या ठिकाणी कोणतेही कार्यक्रम होत नसून या जागेमध्ये कुपवाड आरोग्य विभागाची वाहने लावणे व अन्य स्वच्छता साहित्य ठेवणेत आले आहे. त्यामुळे कुपवाड येथील नागरीकांच्या भावना दुखावल्या आहेत. या नाट्यगृहामध्ये कार्यक्रम सुरु झाल्यास कुपवाडचे वैभवात चांगली भर पडणार आहे. या नाट्यगृहामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सुरु करणेसाठी कुपवाड येथील स्नेहजीत प्रतिष्ठान कुपवाड संस्था व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने (जॉईंटव्हेंचर) येथे कार्यक्रम करणेस तयार आहे. तसा त्यांनी महानगरपालिकेस प्रस्तावही दिला आहे. सदरची संस्था ही नोंदणीकृत असून नाट्यगृहाची देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगिक दुरुस्त्याची जबाबदारी सोपवून याठिकाणी शैक्षणिक,सांस्कृतिक,सभा,समारंभासाठी सदरची संस्था व महानगरपालिका यांच्यात संयुक्त कराराने देणेत यावे. महानगरपालिका व स्नेहजीत प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने (जॉईंटव्हेंचर) या ठिकाणी इमारत व परिसराची देखभाल दुरुस्ती करणेस व कार्यक्रम करवून घेणेस संस्था तयार आहे. त्यास मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.हणमंतराव बंडूजी पवार, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महाराष्ट्रात सांस्कृतिक परंपरेमध्ये सांगलीचे सुपूत्र श्री.बाळासाहेब पळसुळे यांचे योगदान फार मोठे आहे. त्यांनी आजअखेर मराठी-हिंदी-गुजराथी भाषीक २०० पेक्षा जास्त चित्रपटांना संगीताने दिगदर्शीत केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गानसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा मंगेशकर (भोसले) यांनी गायन केले आहे. अशा या महान व्यक्तीमत्वाचे नाव अजरामर राहणेचे दृष्टीने कृष्णा हॉस्पिटल ते १०० फुटी रोड या दक्षिणोत्तर रस्त्यास संगीतकार श्री.बाळ पळसुळे असे नाव देणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

५. मा.संतोष विठ्ठल देवळेकर, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिकेकडे प्रतिनियुक्तीवर मा.शासनाकडून मनपाच्या कामकाज नियमानुसार चालविणे व मनपाच्या कामकाजात सुसूत्रीपणा आणण्यासाठी अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आली आहे.परंतु प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांकडून आजपर्यंत कोणतेही काम सुव्यवस्थित तसेच वेळेत झाले नाही. त्यांच्या सदोष कामकाजामुळे मा.शासनाकडून लेखापरिक्षणात अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत. तसेच अनेक अधिकारी प्रतिनियुक्तीवर आल्यामुळे मनपाच्या आस्थापना खर्चावर देखील भरमसाठ बोजा पडलेला आहे. व अनावश्यक अधिकाऱ्यांची खोगीर भरती झालेली आहे. त्यांच्या गलेलठ्ठ पगारामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर अधिकारी यांची नागरीकांचे बरोबर वर्तणूक वादग्रस्त ठरत आहे. मनपा कामकाजात त्यांच्याकडून निव्वळ शेरेबाजी करुन लोकहिताच्या कामकाजात वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले जात आहे. त्यामुळे नागरीहिताची कामे प्रलंबित पडून महापालिकेची नाहक बदनामी होत आहे. यासाठी सदर प्रतिनियुक्तीचे सर्व अधिकारी शासनाकडे परत पाठविणेबाबत आलेला प्रस्ताव.

... २ ...

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १२/०७/२०१२

महासभा क्रमांक :- ०४

ठराव क्रमांक :- ६८

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या मा.सौ.विद्याताई उत्तमराव कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील वॉर्ड क्र.२१ मधील टिंबर एरिया येथील लगत असणाऱ्या मागसवर्गीय परिसरास भिमनगर असे नामकरण करणेत यावे याबाबत नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करता वॉर्ड क्र.२१ मधील टिंबर एरिया येथील लगत असणाऱ्या मागसवर्गीय परिसरास भिमनगर असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ६६

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मा.सौ.विद्याताई उत्तमराव कांबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील वॉर्ड क्र.२१ मधील नविन वसाहत टिंबर एरिया रोड गुरुद्वार मंदिर समोरील चौकास लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण करणेत यावे याबाबत नागरिकांची वारंवार मागणी होत आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करता वॉर्ड क्र.२१ मधील नविन वसाहत टिंबर एरिया रोड गुरुद्वार मंदिर समोरील चौकास लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- S. H. [illegible]

अनुमोदक :- [illegible]

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

[illegible]

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ७०

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मा.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड हद्दीतील स.नं.४७५/१ मधील खुली जागा सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीची असून, त्यामध्ये महानगरपालिकेने खुले नाट्यगृहाचे बांधकाम केले आहे. सदर नाट्यगृहास प्रसिद्ध तमाशा सम्राट कै.बाबुराव कुपवाडकर असे नामकरण ही करणेत आले आहे. सद्या या ठिकाणी कोणतेही कार्यक्रम होत नसून या जागेमध्ये कुपवाड आरोग्य विभागाची वाहने लावणे व अन्य स्वच्छता साहित्य ठेवणेत आले आहे. त्यामुळे कुपवाड येथील नागरीकांच्या भावना दुखावल्या आहेत. या नाट्यगृहामध्ये कार्यक्रम सुरु झाल्यास कुपवाडचे वैभवात चांगली भर पडणार आहे. या नाट्यगृहामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सुरु करणेसाठी कुपवाड येथील स्नेहजीत प्रतिष्ठान कुपवाड संस्था व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने (जॉइंटव्हेंचर) येथे कार्यक्रम करणेस तयार आहे. तसा त्यांनी महानगरपालिकेस प्रस्तावही दिला आहे. सदरची संस्था ही नोंदणीकृत असून नाट्यगृहाची देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगिक दुरुस्त्याची जबाबदारी सोपवून याठिकाणी शैक्षणिक,सांस्कृतिक,सभा,समारंभासाठी सदरची संस्था व महानगरपालिका यांच्यात संयुक्त कराराने देणेत यावे. महानगरपालिका व स्नेहजीत प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने (जॉइंटव्हेंचर) या ठिकाणी इमारत व परिसराची देखभाल दुरुस्ती करणेस व कार्यक्रम करवून घेणेस संस्था तयार आहे. त्यास मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सदर इमारत व परिसर देखभाल व दुरुस्ती करणे च्या अटीवर स्नेहजीत प्रतिष्ठान, कुपवाड यांना ९ वर्ष मुदतीने देणेत यावा व या ठिकाणी व्यावसाईक स्वरुपाची कार्यक्रम होतांना त्यांचे भाडे म.न.पा.कडे जमा करणेत यावे. असे ही सभा सुचित करीत असून, इतर कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानने आपल्या परीने नाट्यगृह उपलब्ध करुन द्यावे असे ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापन
मा.आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली काम करेल.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ७१

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मा.हणमंतराव बंडूजी पवार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्रात सांस्कृतिक परंपरेमध्ये सांगलीचे सुपूत्र श्री.बाळासाहेब पळसुळे यांचे योगदान फार मोठे आहे. त्यांनी आजअखेर मराठी-हिंदी-गुजराथी भाषीक २०० पेक्षा जास्त चित्रपटांना संगीताने दिगदर्शीत केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गानसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा मंगेशकर (भोसले) यांनी गायन केले आहे. अशा या महान व्यक्तीमत्वाचे नाव अजरामर राहणेचे दृष्टीने कृष्णा हॉस्पिटल ते १०० फुटी रोड या दक्षिणोत्तर रस्त्यास संगीतकार श्री.बाळ पळसुळे असे नाव देणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य आनंदा देवमाने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या मिरज येथील विजय कॉलनी शिवाजी नगर मिरज या अंतर्गत रस्त्यास कै.डॉ.रविंद्र धुमाळे असे नामकरण करणेबाबत नागरीकांची मागणी होत आहे. तरी सदर रस्त्यास कै.डॉ.रविंद्र धुमाळे असे नामकरण महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ७२

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मा.संतोष विठ्ठल देवळेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेकडे प्रतिनियुक्तीवर मा.शासनाकडून मनपाच्या कामकाज नियमानुसार चालविणे व मनपाच्या कामकाजात सुसूत्रीपणा आणण्यासाठी अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आली आहे.परंतु प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांकडून आजपर्यत कोणतेही काम सुव्यवस्थित तसेच वेळेत झाले नाही. त्यांच्या सदोष कामकाजामुळे मा.शासनाकडून लेखापरिक्षणात अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत. तसेच अनेक अधिकारी प्रतिनियुक्तीवर आल्यामुळे मनपाच्या आस्थापना खर्चावर देखील भरमसाठ बोजा पडलेला आहे. व अनावश्यक अधिकाऱ्यांची खोगीर भरती झालेली आहे. त्यांच्या गलेलठ्ठ पगारामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर अधिकारी यांची नागरीकांचे बरोबर वर्तणूक वादग्रस्त ठरत आहे. मनपा कामकाजात त्यांच्याकडून निव्वळ शेरेबाजी करुन लोकहिताच्या कामकाजात वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले जात आहे. त्यामुळे नागरीहिताची कामे प्रलंबित पडून महापालिकेची नाहक बदनामी होत आहे. यासाठी सदर प्रतिनियुक्तीचे सर्व अधिकारी शासनाकडे परत पाठविणेबाबत आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता, प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी व नगरसेवक यांचेमध्ये समन्वयाचा अभाव असलेचे दिसून येते. त्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रतिनियुक्तीवरील अधिकारी व पदाधिकारी, नगरसेवक यांची समन्वयाची बैठक बोलवावी व अधिकारी व नगरसेवक यांच्यामधील गैरसमज समन्वयाने दूर करावा असे ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :- Salim A. [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Keerron

महापौर,

प्रशासन अधिकारी (आढ्या)
सदरचा ठराव मा.आयुक्तांचे यांचे निर्देशनास आणून कार्यवाही ठेवा.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ७३

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मा.नंदकुमार माधवराव देशमुख यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाडचे दैनंदिन व इतर कामकाज तातडीने व तत्परतेने व्हावे व महापालिकेच्या सुविधा नागरीकांना विनाविलंब मिळाव्यात या हेतूने दि.२१/०२/२००९ रोजी महासभेने एच.सी.एल.इन्फोसीस (ई-गर्व्हनन्स्) पूणे यांना ठराव करुन नागरी सुविधा केंद्रामार्फत सुविधा देणेसाठी महासभा ठराव क्र.१४९ दि.२१/०२/२००९ कायम होणेपूर्वी (कन्फर्म) दि.०२/०३/२००९ रोजी कामाची वर्क ऑर्डर दिली परंतू ज्या हेतूने कामास सुरुवात होणे अपेक्षित होते. तो हेतू काय सफल झाला नाही. तब्बल ११ महिने नंतर १७ जानेवारी २०१० रोजी नागरी सुविधा केंद्राचे उद्घाटन झाले व प्रत्यक्ष कामास सुरुवात दि.१८ जानेवारी २०१० रोजी ती ही फक्त एकच केंद्रात आणि फक्त जन्म-मृत्युचे दाखले देण्याइतपत मर्यादित. आज अखेर सुद्धा निविदातील शर्ती-अटीनुसार पूर्ण क्षमतेने सर्व केंद्रे सुरु करणेत कंपनीस अपयश आले आहे. सदर कंपनीशी केलेले करारपत्र निव्वळ १००/- रुपयेच्या स्टँम्पवर केलेले असून सदर करारच सिल ही न होता कामाची वर्क ऑर्डर दिली गेली आहे. त्यामुळे सदरच्या करारपत्रानुसार महापालिकेस देय रक्कम आदा करता येणार नाही. एकाच कामाचे दोन करारपत्र करता येणार नाहीत. निविदा मधील व करारपत्रातील अटीनुसार विनामुल्य सेवा अगोदर सुरु करणे क्रमप्राप्त होते. परंतु आज अखेर विनामुल्य कोणतीच सेवा सुरु करणेस कंपनीस यश आलेले नाही. उलट मुल्याधारीत सेवाही पूर्ण क्षमतेने न करता महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी केलेला वसुल असो अथवा डिमांड नोटीसा इत्यादी सेवांचे ट्रॅन्जेंक्शन ही सदरची कंपनी आपले नावावर करुन बिले वसुल करीत आहे. त्यामुळे महापालिकेने ज्या हेतूने सदर कंपनीस काम दिले होते तो हेतू सफल होत नसलेने सदर कंपनीचा ठेका रद्द व्हावा व महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान थांबवावे या करीता चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

प्रशासनाने ई गर्व्हनन्स् प्रणाली सुरळीत व तांत्रिक दृष्ट्या योग्य रितीने राबविण्यासाठी गठीत केलेल्या स्टेरिंग कमीटीची एकही मिटींग घेतली नसलेने एच.सी.एल.ठेक्यामधील अनियमिततेबाबत माहिती सभागृहात मिळू शकलेली नाही. त्यामुळे या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रिये पासून आज पर्यत जी काही प्रक्रिया राबविली गेली याची माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. ई-गर्व्हनन्स् प्रणाली बाबतच्या निविदा संविदा करारपत्रातील शर्ती अटी तपासणे गरजेचे आहे. यासाठी या संपूर्ण प्रक्रियेचे थर्ड पार्टी ऑडिट सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी ऑफ इंडिया यांचेकडून करुन घेणेत यावे असे ही सभा सूचित करीत असून, याकामी गठीत केलेल्या स्टेअरींग कमिटीची मिटींग प्रशासनाने तातडीने बोलवून स्टेरींग कमेटी समोरी ई-गर्व्हनन्स् बाबत महापालिकेने ठरविलेले धोरण व त्यानुसार आजअखेर झालेले काम व त्याबाबतची अनुषंगिक कागदपत्रे सादर करावीत व स्टेअरींग कमेटीचा याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल पुढील महासभेसमोर सादर करावा व थर्ड पार्टी ऑडीटचा अहवाल येईपर्यत एच.सी.एल.कंपनीला कोणतेही पेमेंट अदा करण्यात येवू नये असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- S.H. [signature]

अनुमोदक :- Sana A. [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर,

सिस्टीम मॅनेजर

सदरचा ठराव मा. आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही व्हावी.

[signature]

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ७४

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मा.अजित नारायण दोरकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

केंद्र सरकार पुरस्कृत आय.एच.एस.डी.पी.योजनेंतर्गत मिरज येथील संजय गांधी नगर झोपडपट्टीचा समावेश आहे. ज्या ठिकाणी घरकुलांचे काम चालू आहे त्या ठिकाणी ज्या वेळी महापालिका व शेल्टर असोसिएट यांचे संयुक्त विद्यमाने सर्व्हे झाला त्यावेळी त्याच जागेवरती ३७२ झोपड्या होत्या त्यातील ३११ झोपडपट्टी वाशीयांचा समावेश असून, इतर ६१ झोपड्यांचा त्यांच्या मध्ये समावेश नाही त्यांचा या योजनेत समावेश करण्याबाबतच्या प्रस्तावावर सभेमध्ये चर्चा झाली चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

आय.एच.एस.डी.पी.योजनेमध्ये लाभार्थींचा समावेश करण्यासाठीचे या योजनेचे निकष पात्रतेमध्ये वरील ६१ लाभार्थी बसत असतील तर छाननीअंती त्यांचा या योजनेत समावेश करण्यासाठी प्रशासनाने अहवाल मा.महासभेकडे सादर करावा असे ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर,

शहर अभियंता

सदस्य ठराव मा.आयुक्तांच्या निर्देशनाने आणुन कार्यवाही होवेल.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.